राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये
प्राप्त झालेली तक्रार
तक्रार क्रमांक : १६१/२०२२

तक्रारकर्ता, श्री.गजानन आत्माराम डोलारकर,
रा.वसंत नगर, मानोरा, ता.मानोरा, जि.वाशिम

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय मानोरा, ता.मानोरा, जि.वाशिम

प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय मानोरा, ता.मानोरा, जि.वाशिम

तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २२.०८.२०२३

तक्रारकर्ता : उपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| ०९.०४.२०२१ | -- | २२.०६.२०२२ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र.५२३/२०१८ दि. ०९.०४.२०२१ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीवर दिनांक २२.०८.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. उत्तरवादी अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील (अपील क्र.५२३/२०१८) मध्ये दिनांक ०९.०४.२०२१ रोजी सुनावणी घेवून " १. अपिलार्थीस अद्यापही माहिती देण्यात आली नसल्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जोडपत्र अ नुसार मागितलेली माहिती नोंदणीकृत डाकेने विनाशुल्क पुरवावी व तसा अनुपालन अहवाल आदेश निर्गमित झाल्याचा दिनांकापासुन ३० दिवसाच्या मुदतीत आयोगास सादर करावा. २. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.परशराम भोसले यांनी त्यांना अपिलार्थीकडून कलम ६(१) नुसार प्राप्त झालेला माहितीचा अर्ज ३० दिवसाचे विहीत मुदतीत निकाली न काढून कलम ७(१) चा भंग केला. म्हणून कलम २०(१) व कलम १९(८) (ग) नुसार त्यांना रु.२५,०००/- (रु.पंचविस हजार फक्त) ची शास्ती करण्यात येते. जन माहिती अधिकाऱ्याचे आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर शास्तीची रक्कम १ महिन्याचे

आत वसुल करुन तसा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. ३. अपिलार्थीने कलम ६(१) नुसार अर्ज करुन मागितलेली माहिती प्रदान करण्यास अनुज्ञेय असतांना देखील तिचे अपिलार्थीस वेळेत प्रदान झाले नाही. परिणामी त्यांना शारीरीक, मानसिक व आर्थीक त्रास सहन करावा लागला म्हणून कलम १९(८) (ख) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस रु.५०००/- ची नुकसान भरपाईची अदा करण्याची शिफारस करण्यात येते. सार्वजनिक प्राधिकरणाने प्रस्तुत आदेश पारित झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत अपिलार्थीस धनादेशाद्वारे नुकसान भरपाईची अदायी करुन अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा." असे आदेश पारित केले होते.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेला खुलासा व तक्रारकर्ता यांचे युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, द्वितीय अपील क्र.५२३/२०१८ यात दि. ०९.०४.२०२१ रोजी पारित केलेल्या आदेशात वरील प्रमाणे निर्देश देण्यात आले होते. यातील तक्रारकर्ता यांना दि.२८.१२.२०२१ रोजीच आयोगाच्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध नसल्याचे सूचीत करण्यात आले असून रु.२५,०००/- ची रक्कम लेखाशिर्षाखाली जमा करण्यात आलेली आहे. यातील कलम १९ (८)(ख) नुसार द्यावयाची नुकसान भरपाई बाबत विद्यमान तहसिलदार, मानोरा यांनी तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी श्री.सुनिल चव्हाण यांचेशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती या तक्रारकर्त्यास तसेच आयोगास सादर केलेले असून वरील निर्देशाचे तत्काळ अनुपालन करण्याचे (जर याला कुठल्याही मा.उच्च न्यायालय यांचे स्थगीती नसल्यास) वरील आदेशाचे अनुपालन करणे बंधनकारक असल्याची बाब लक्षात घेता, द्वितीय अपील क्र.५२३/२०१८ यात दि. ०९.०४.२०२१ रोजी पारित केलेल्या आदेशातील नुकसान भरपाईची रक्कम दोन आठवड्याच्या आत तक्रार कर्त्यास प्रदान करण्यात यावी व तसा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा, या निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून तक्रार अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २२.०८.२०२३**

जावक क्रमांक ३८९ दिनांक **23 JAN 2024**